## लघुसंशोधन प्रकल्पाचा गोषवारा. (SUMMARY OF THE FINDINGS)

### उतम कांबळे यांच्या कथांमधील सामाजिकता.

आधुनिक मराठी साहित्यात १९६० नंतर विविध वाङ:मयीन प्रवाहातील लेखक जोमाने आपले लेखन करू लागले. ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी, कामगार, महानगरी अशा समाज वर्गातून येणा-या लेखकांनी आपले वास्तव जीवनानुभव शब्दांकित करुन मराठी साहित्याचा परीघ वाढविला. कथा, कादंबरी, कविता, नाटक अशा विविध साहित्यप्रकारांमधून त्यांनी विपुल साहित्यनिर्मिती केली. याच कालखंडातील एक महत्वपूर्ण लेखक म्हणजे उत्तम कांबळे हे होय. मागील चार दशकांपासून उत्तम कांबळे हे सातत्याने लेखन करीत आहेत. नाटकाव्यतिरिक्त इतर सर्वच साहित्यप्रकारांमध्ये त्यांनी मनसोक्त लेखन केले आहे. पत्रकार, प्रभावी वक्ता, तत्वचिंतक म्हणून साहित्य आणि सामाजिक क्षेत्रात त्यांची विशेष ओळख निर्माण झाली आहे. त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांची संख्या आजपर्यंत ५० च्या वर गेलेली आहे. सामाजिक जाणीवेतून आणि बांधिलकीतून होत असणारे त्यांचे लेखन सामाजिक वास्तवाचा वेध घेणारे आहे. माणूस आणि माणसाचे पर्यावरण हा त्यांच्या लेखानाचा केंद्रबिंदू आहे. अशा या लेखकाच्या साहित्याचा गंभीरपणे अभ्यास होणे ही वर्तमान काळाची गरज लक्षात घेवून त्यांनी लिहिलेल्या कथांचाच फक्त सामाजिकतेच्या अंगाने अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने केला आहे.

उत्तम कांबळे यांचे आजपर्यंत पाच कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. 'रंग माणसांचे', 'कथा माणसांच्या', 'कावळे आणि माणसे', 'न दिसणारी लढाई', आणि 'परत्या' या कथासंग्रहांमधून त्यांनी लिहिलेल्या कथांची एकूण संख्या १०० च्या जवळपास जाणारी आहे. मानवी जीवनातील विविध रंग त्यांच्या कथांमधून चित्रित होतात. माणूस हा त्यांच्या कथांच्या केंद्रस्थानी आहे. या माणसाची सुख दु:खे, त्याचे सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरण, त्याचा जीवनसंघर्ष अशा अनेक अंगानी या कथांचा अभ्यास केला असता मराठी साहित्यातील उत्तम कांबळे यांच्या कथालेखनाचे वेगळेपण लक्षात येण्यास मदत होते. प्रस्तुत संशोधनाची काही उद्दिष्टे सुरवातीला निश्चित केली होती. त्यात प्रामुख्याने उत्तम कांबळे यांच्या कथांचे स्वरूप अभ्यासणे, त्यांच्या कथांमधून दिसणा-या सामाजिकतेचे स्वरूप अभ्यासणे, त्यांच्या कथालेखनाचा आणि सामाजिक प्रश्नांचा परस्पर संबंध अभ्यासणे आणि कथाकार म्हणून त्यांचे मराठी साहित्यातील स्थान निश्चित करणे इ. चा समावेश होता. या उद्दीष्ट्यांच्या पूर्तीसाठी उत्तम कांबळे यांच्या कथांचा, त्यातून दिसणा-या सामाजिकतेचा सखोल शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. हा शोध एकूण तीन प्रकरणांमधून घेतला आहे.

प्रस्तुत प्रबंधातील पहिले प्रकरण 'उत्तम कांबळे यांचे वाङ:मयीन व्यक्तिमत्व आणि जडणघडण' असे आहे. या प्रकरणात उत्तम कांबळे यांचे वाङ:मयीन व्यक्तिमत्व अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे. ते करीत

असताना त्यांचे बालपण व शिक्षण, वैचारिक पायाभरणी, त्यांची लेखानामागील प्रेरणा, त्यांची लेखनामागील भूमिका आणि त्याचा साहित्यविषयक दृष्टीकोन या मुद्यांच्या आधारे हे विश्लेषण केलेले आहे.

उत्तम कांबळे यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ या गावी झाला. महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्यात त्यांचे बालपण गेले आणि काही काळ शिक्षणही झाले. लहानपणापासूनच त्यांना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी सामना करावा लागला. जगण्यासाठी लहानपणापासूनच त्यांनी गावकीची कामे, कंपाऊंडर, बाइंडर, सेल्समन, पेपर विक्रेता अशा प्रकारची कामे करावी लागली. वाचनाची आवड त्यांना शालेय शिक्षणापासूनच लागली होती. पुढे महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना त्यांचा विविध सामाजिक चळवळीशी संबंध आला व त्यांचे अनुभवविश्व समृद्ध होत गेले. पत्रकार म्हणून काम करीत असतांना आपल्या भोवतालच्या प्रश्नांनी त्यांना अस्वस्थ केले आणि त्यातूनच त्यांच्या लेखनाला सुरवात झाली. माणूस आणि माणसाच्या भोवतालचे प्रश्न, समस्या समजावून घेणे ही त्यांची साहित्यविषयक भूमिका आहे. केवळ दलितत्वाच्या मर्यादेत न अडकता त्यांनी समग्र मानवतावादी लेखन केले आहे. म्हणूनच त्यांचे लेखन सर्वच स्तरातील वाचकांमध्ये लोकप्रिय झाले. विविध पुरस्कारांनी त्यांच्या साहित्याचा, लेखनाचा गौरव करण्यात आला. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष आणि अध्यक्ष पद त्यांनी भूषविले. त्यांच्या जडणघडणीचा आणि वाड:मयीन व्यक्तीमत्वाचा, त्यातील विविध पैलूंचा विचार प्रस्तुत प्रकरणात करुन या सर्व विश्लेषणाच्या आधारे जे निष्कर्ष हाती आले त्यांची नोंद प्रकरणाच्या शेवटी केली आहे.

प्रबंधातील दुसरे प्रकरण ‘उत्तम कांबळे यांच्या कथांचे स्वरूप’ हे असून सदर प्रकरणात कथाकार उत्तम कांबळे उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. १९८० नंतरच्या काळातील मराठीतील एक महत्वाचे लेखक म्हणून उत्तम कांबळे ओळखले जातात. वैविध्यपूर्ण आशय आणि विषयांमुळे त्यांनी लिहिलेल्या कथांचे वेगळेपण वाचकांच्या  लक्षात येते. त्यांच्या कथांचे हे वेगळेपण तपासण्यासाठी काही आशयसूत्रे निश्चित करून त्याद्वारे सविस्तर विवेचन प्रस्तुत प्रकरणात केले आहे. भुकेचा संघर्ष, जातीयतेचे चटके, धार्मिक अंधश्रद्धा, भटक्या विमुक्तांचा जीवनसंघर्ष, दोन पिढ्यांमधील संघर्ष,, नैतिकता जपणारी माणसे आणि दूषित पर्यावरण या आशय सुत्रांद्वारे उत्तम कांबळे यांच्या कथांचे विश्लेषण प्रस्तुत प्रकरणात केले आहे. याबरोबरच कथांमधील पात्रांचे वेगळेपण, व्यक्तीवर्णन, परिसरवर्णन, भाषाशैली या घटकांच्या सहाय्याने देखील त्यांच्या कथा अभ्यासल्या आहेत. मराठी साहित्यात पारंपरिक कथांमधून जो जीवनाशय मांडला गेला नव्हता तो उत्तम कांबळे यांनी आपल्या कथांमधून मांडला आहे. व्यापक जीवनानुभव गाठीशी असल्यामुळे त्यांच्या जवळजवळ सर्वच कथा प्रखर वास्तवाचे दर्शन घडवितात. या सविस्तर विश्लेषणाच्या आधारे जे निष्कर्ष हाती आले आहेत ते प्रकरणाच्या शेवटी देवून समारोप केलेला आहे.

प्रस्तुत प्रबंधातील तिसरे आणि शेवटचे प्रकरण हे ‘उत्तम कांबळे यांच्या कथांमधील सामाजिकता’ असे असून हे या प्रबंधाचे गाभा प्रकरण आहे. साहित्य आणि समाज यांचा परस्पर संबंध असतो. लेखक समाजातूनच निर्माण होत असतो. त्याला त्याच्या लेखनाचे विषय तसेच प्रेरणा समाजातूनच प्राप्त होत असते. मानवी जीवनाचे दर्शन घडविणे हे साहित्याचे मुलभूत उद्दिष्ट असते. कोणताही लेखक त्याला अपवाद नसतो. सामाजिकता त्याच्या  लेखनाचा प्राण असतो. ही सामाजिकता नेमकी कशी असते ते सांगण्याचा प्रयत्न

प्रकरणाच्या सुरवातीला केला आहे. सामाजिकतेचे जे प्रमुख घटक आहेत त्या घटकांच्या आधारे उत्तम कांबळे यांच्या कथांमधील सामाजिकतेचे स्वरूप सविस्तर उलगडून दाखविण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रकरणात केला आहे.

उत्तम कांबळे यांच्या कथा प्रखर समाजजीवनाचे चित्रण करणा-या कथा आहेत. समाजजीवनातील विविधता, जीवनसंघर्ष, माणसांचे विविध रंग, सामाजिक घडामोडी आणि त्यातून बदलणारे त्यांचे भावविश्व अशा अनेक अंगानी या कथा विचारप्रवृत्त करतात. या सर्वच विवेचनाच्या आधारे हे स्पष्ट होते की उत्तम कांबळे हे मराठीतील एक महत्वाचे सामाजिक कथाकार आहेत.

एकूणच या संशोधन विषयाच्या अनुषंगाने जी उद्दिष्टे निश्चित केली होती त्यांचे विश्लेषण करण्याचा पुरेसा प्रयत्न प्रस्तुत प्रबंधात केला आहे. मराठी साहित्यातील उत्तम कांबळे यांचे कथाकार म्हणून असलेले स्थान आणि मराठी साहित्याला त्यांनी दिलेले योगदान निश्चितच महत्वपूर्ण आहे.

प्रा.डॉ.विवेक कमलाकर खरे
सहाय्यक प्राध्यापक
मराठी विभाग